E-mail: companysecretary@controlprint.com

NOTICE

Transfer of Equity Shares and Dividend of the Company to Investor Education and Protection Fund (IEPF) Authority

NOTICE is hereby given that pursuant to Section 124(6) of the Companies Act, 2013 ("the Act") read with the Investor Education and Protection Fund Authority (Accounting, Audit, Transfer and Refund) Rules, 2016 ("the Rules"), Control Print Limited ("the Company") will transfer all equity shares in respect of which dividend has not been paid or claimed for seven consecutive years or more to the Investor Education and Protection Fund Suspense Account ("IEPF Account").

The equity shares which will be transferred by the Company are those in respect of which Final Dividend for the Financial Year 2018-2019 was declared and not encashed, which are liable to be transferred to IEPF Account as per the said Rules.

The details of the Shareholders who have not encashed their Dividends for seven consecutive years and whose shares are therefore liable for transfer to IEPF Account is made available on our website of the Company at www.controlprint.com for information and necessary action by the Members.

Relevant communication dated June 25, 2026 has been sent to the concerned Members, requesting them to claim their unpaid or unclaimed dividend amount(s) on or before 27th September, 2026. Members have been informed that failure to claim the same on or before the said date would result into the transfer of their above-mentioned equity shares to the IEPF Suspense Account.

The concerned Members may note that upon transfer of such equity shares to the IEPF Suspense Account, no claim shall lie against the Company (1) in respect of unpaid or unclaimed dividend amount(s) and (2) in respect of equity shares transferred to the IEPF Suspense Account. Pursuant to the provisions of the Act and the Rules, the concerned Members may claim the transferred shares or apply for refund in respect of unpaid or unclaimed dividend amount(s) and shares from the IEPF Authority, the details in respect thereof are available at www.iepf.gov.in.

Members requiring any clarifications or assistance in this regard may write to the Company's Registrar and Share Transfer Agent – Bigshare Services Private Limited having office at S6-2, 6th floor Pinnacle Business Park, Next to Ahura Centre, Mahakali Caves Road, Andheri (East) Mumbai - 400093, Telephone number 022 - 62638200 or send an e-mail to the Company at companysecretary@controlprint.com.

For Control Print Limited
Sd/-
Murli Manohar Thanvi
Company Secretary and Compliance Officer

Place : Mumbai
Date : June 26, 2026

Back

पंतप्रधान मोदी जाणार सेशेल्सच्या दौऱ्यावर

नवी दिल्ली : सेशेल्सच्या राष्ट्रीय दिनाच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी २७ ते २९ जून दरम्यान सेशेल्सच्या अधिकृत दौऱ्यावर जाणार आहेत. भारतीय संरक्षण दलाची एक तुकडी आणि भारतीय नौदलाची दोन जहाजे या सोहळ्यात सहभागी होणार असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे.

संवादायन

श्रीनिवास हेमाडे

सामाजिक संवादाचा आदर्श मार्ग

परिषद म्हणजे 'सभोवार बसणे' (परि = सभोवती, सद् = एकत्र बसणे). वेदान्त तत्त्वज्ञानातील 'ब्रह्म' या अंतिम सद्वस्तुविषयक चर्चेसाठी एकत्र आयोजित केलेल्या विद्वानांची समिती' म्हणजे 'ब्रह्मपरिषद'. अशी चर्चा ज्या वैदिक ग्रंथात असते त्यांना 'ब्राह्मणग्रंथ' म्हटले जाते, त्यांचा उल्लेख 'ब्राह्मणे' असा केला जातो. म्हणून सर्व 'ब्राह्मण ग्रंथा'तील चर्चांनाही 'ब्रह्मपरिषद' म्हटले जाते.

तात्त्विक, पौराणिक व आधुनिक अर्थ

उपनिषद (इ.स.पूर्व १००० ते इ.स.पूर्व ६००) काळात जन (मूळ रहिवासी) व गण (कुल, लढाऊ टोळ्या) यांच्या राजकीय धोरणविषयक 'परिषदा' आयोजित केल्या जात होत्या. (कौरव पांडव सभा किंवा रामायणातील आदिवासींच्या रामाला मदत करण्याविषयीच्या बैठका). नंतर 'ब्रह्म' या ज्ञानवस्तूविषयी चर्चा करणे हे 'कर्म' करणाऱ्या कोणत्याही वर्णाच्या, कुळाच्या तज्ज्ञ, विद्वान, वेदान्ती स्त्री-पुरुषांची परिषद म्हणजे 'ब्रह्मपरिषद' असा अर्थ बनला. दोन्ही अर्थांनी 'ब्रह्मपरिषद' हा शब्द 'कर्म'वाचक आहे. नंतरच्या अर्थाचा परिणाम म्हणून 'ब्रह्म' या अंतिम सद्वस्तूला जाणतो तोच 'ब्राह्मण' (प्रज्ञानं ब्रह्म , अहम् ब्रह्मास्मि, तत् त्वम् असि, अयम् आत्मा ब्रह्म, सर्वं खल्विदं ब्रह्म असे जाणणारा तो ब्राह्मण) हा अर्थ रूढ झाला. उपयोजनानुसार 'ब्रह्मपरिषद' शब्दाचे दोन अर्थ होतात. (१) तात्त्विक अर्थ : ऋषी, मुनी आणि ब्रह्मवेत्ते सृष्टीला रचयिता आहे का?, असेल तर कोण आहे? की सृष्टी स्वयंसिद्ध आहे, 'ब्रह्म' म्हणजे काय', 'मी कोण आहे? (को हं?) सारख्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी एकत्र जमणारा गट. (२) पौराणिक अर्थ : पौराणिक कथांनुसार, ब्रह्मलोकात ब्रह्मदेवाच्या उपस्थितीत देवदेवता, सप्तर्षी आणि सन्मान्य ब्रह्मर्षी यांच्या कोणत्याही विषयावरील चर्चेची 'सभा'.

विद्यमान काळात 'ब्राह्मण' हा शब्द वर्णवाचक आणि जातिवाचक बनला आहे. परिणामी भारतातील विविध राज्यांमध्ये आणि भारताबाहेरील काही देशात अनेक मंडळे, संघ, गट ब्राह्मण समाजाच्या अनेक बिगर सामाजिक संस्थांनी त्यांच्या नावांमध्ये 'परिषद' हा शब्द जोडला आहे. त्यांच्या सर्व बैठकांना व सभांना 'ब्रह्मपरिषद' म्हटले जाते. त्यांची दोन उद्दिष्टे आढळतात. (१) वैचारिक कार्य : वैदिक हिंदू धर्माच्या आध्यात्मिक, धार्मिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सनातन संस्कृतीच्या जतनासाठी आणि उन्नतीसाठी काम करणे.



(२) सामाजिक कार्य : पूर आणि दुष्काळ, अपघात इत्यादी आपत्तीग्रस्त लोकांची तसेच गरिबांची सेवा करण्याच्या हेतूने सामाजिक कल्याणाचे कार्य करणे. सामाजिक कार्यात सातत्य राखण्यासाठी या परिषदांच्या बैठका नियमितपणे आयोजित केल्या जातात.

डॉ. ब्रायन ब्लॅककृत वादाचे चार प्रकार

लॅंकेस्टर विद्यापीठातील (यू.के.) 'तत्त्वज्ञान आणि धर्म अध्ययन विभागा' तील भारतीय धर्म-संस्कृती व संवाद अभ्यासक प्राध्यापक डॉ. ब्रायन ब्लॅक (हयात...) यांनी त्यांच्या 'डॉयलॉग इन अर्ली साऊथ एशियन रिलिजन्सः हिंदू, बुद्धिस्ट, अँड जैन ट्रॅडिशन्स' आणि 'इन डायलॉग विथ क्लासिकल इंडियन ट्रॅडिशन्सः एन्काऊंटर, ट्रान्सफॉर्मेशन अँड इंटरप्रिटेशन', या ग्रंथांमध्ये उपनिषदांचा अभ्यास 'सामाजिक संवादाचे वाङमय' या भूमिकेतून केला आहे. वैदिक वाङमयाच्या 'ललित वाङमय' या अर्थाने झालेल्या अभ्यासामुळे भारतातील विद्यापीठीय साहित्य, भाषा विभागात; विविध संप्रदायांमध्ये 'संत वाङमय' या रुपात उदंड लेखन झाले. तथापि वेद-उपनिषदांकडे 'ललित वाङमय' म्हणून पाहणे आणि त्यातही 'सामाजिक संवादाचे वाङमय' या भूमिकेतून पाहणे व त्यानुसार संशोधन करण्याचे श्रेय पाश्चात्य अभ्यासकांकडे जाते. ही उत्तराधुनिक विधायक दुर्मीळ दृष्टी आहे. त्यातून भारतीयांच्या हाती काही नवीन गोष्टी लागू शकतात.

डॉ. ब्लॅकच्या मते, 'ब्रह्मपरिषद' रूपी 'वाद-संवादा' चे चार प्रकार होतात. (१) ब्राह्मण गुरूने ब्राह्मण शिष्याला शिकविणे (उपदेशातून व चर्चा करण्यातून 'ज्ञानदान' या हेतूचा उदय) (२) दोन ब्राह्मण विद्वानांमधील वादविवाद (ब्राह्मोद्याचा स्पर्धात्मक पैलू) (३) ब्राह्मण गुरु आणि राजे- राज्यकर्ते यांचा संवाद (उपनिषदांचा राजकीय परिप्रेक्ष्य) (४) ब्राह्मण गुरु आणि स्त्रिया यांच्यातील संवाद. (उपनिषदातील व्यक्तिनिष्ठता आणि लिंगभेदाची मांडणी). या संवादातून सहभागी ज्ञानीजनांमध्ये एका प्रकारे कलारूप 'नाट्य' आकारास तर येते. शिवाय उपनिषदांचा सामाजिक संदर्भ आणि त्यांची सामाजिक उपयुक्ततादेखील लक्षात येते.

भारतीय परंपरेनुसार 'तत्त्वज्ञान' (ब्रह्मज्ञान प्राप्ती) ही एकांतात राहून केवळ साधना, तप इत्यादी करूनच मोक्षाप्रत जाण्याची गोष्ट आहे. पण ब्लॅक अधोरेखित करतो की " 'तत्त्वज्ञान ही केवळ साधना, तपश्चर्या इत्यादी खासगी कृती करूनच मिळवावयाची गोष्ट नाही; तर ती 'चर्चा आणि वादविवाद-संवाद' यांच्या 'माध्यमा' तून प्राप्त करण्यासारखी विशिष्ट उच्च दर्जाची सार्वजनिक कृती आहे, असा संदेश उपनिषदे देतात! म्हणून उपनिषदांना व्यापक सामाजिक संदर्भ आणि सामाजिक उपयुक्तता आहे." उपनिषदांप्रमाणेच साऱ्या जैन कथा आणि बौद्ध 'मिलिंद प्रश्न' आणि 'कथावत्तु' सारख्या हजारो संवाद साहित्यातून प्राचीन भारतीयाची सामाजिकता व सुसंवादवृत्ती दिसून येते. ब्लॅकच्या मते 'परिषद' हा भारतीयांनी अबाधित राखलेला सामाजिक संवादाचा आदर्श मार्ग व माध्यम आहे.

राय, मिश्रा यांचे राजीनामे

पान १ वरून

शिफारशींनंतर आठ जणांवर काल गुन्हा दाखल करण्यात आला. रोख रक्कम मोजण्याची जबाबदारी असलेल्या सहा कर्मचाऱ्यांसह एकूण आठ जणांना आरोपी करण्यात आले आहे. आरोपी पैशांची अफरातफर करतानाचे चित्रण सीसीटीव्हीमध्ये आढळल्यानंतर या आरोपींना अटक करण्यात आली. अविनाश शुक्ला, अनुकल्प मिश्रा, लवकुश मिश्रा, मनीष कुमार यादव, करुणेश पांडे, रामशंकर मिश्रा, सुभाष श्रीवास्तव आणि रामशंकर यादव ऊर्फ टिन्नू अशी त्यांची नावे आहेत. हे सर्वजण मंदिरात येणारी रोख रक्कम आणि मौल्यवान वस्तूंच्या मोजणी प्रक्रियेत सहभागी होते. हे सर्व आरोपी अयोध्येतच होते. त्यांच्या अटकेच्या कारवाईला पोलिसांनी आज दुजोरा दिला. आरोपींवर चोरी, गुन्हेगारी कट रचणे आणि भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप आहेत.

गर्भलिंग निदानावर करडी नजर

पान १ वरून

रोखण्यासाठी नियमित तपासण्या, विशेष मोहीम, डिकॉय ऑपरेशन्स, माहिती देणाऱ्यांसाठी बक्षीस योजना आणि न्यायालयीन कारवाई अशा बहुआयामी उपाययोजना राबविण्यात येत आहेत. तज्ज्ञांच्या मते, गर्भलिंग निदानाची समस्या समाजातील मुलगा प्राधान्याची मानसिकता हे प्रमुख कारण आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील शून्य ते सहा वयोगटातील बाललिंग गुणोत्तर गेल्या दोन दशकांत चिंताजनक पद्धतीने घसरले आहे. बीड जिल्ह्यात बाललिंग गुणोत्तरात सर्वाधिक ८७ अंकांची घसरण नोंदविण्यात आली असून बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्यांमध्येही मोठी घट दिसून आली आहे. दुसरीकडे सातारा, कोल्हापूर, सांगली आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये काही प्रमाणात सुधारणा झाल्याचे दिसून येते. दरम्यान, आरोग्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकींमध्ये जिल्हास्तरावर अधिक कडक देखरेख ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

सोनोग्राफी केंद्रांवर देखरेख

डिसेंबर २०२४ पासून राज्यात ११,८३७ सोनोग्राफी केंद्रे कार्यरत आहेत. जून २०२४च्या मोहिमेदरम्यान ११,५८६ सोनोग्राफी केंद्रांची तपासणी केली गेली. ६,०५६ गर्भपात केंद्रांची तपासणी केली.

स्टिंग ऑपरेशन्समध्ये वाढ

एप्रिल २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत राज्यात ८२ डिकॉय ऑपरेशन्स केली. पैकी ११ कारवाया यशस्वी ठरल्या. यानंतर कारवाईची गती वाढवत २०२५-२६ या वर्षात मार्चअखेरपर्यंत राज्यात तब्बल ११८ स्टिंग ऑपरेशन्स करण्यात आली.

समाजातील मुलगा प्राधान्याच्या मानसिकतेत बदल होणे आवश्यक आहे. बोगस डॉक्टर आणि त्यांचे नेटवर्क यांच्यावर कठोर कारवाई केली जात असून डिकॉय ऑपरेशन्सचे प्रमाण वाढविण्यात आले आहे.

- डॉ. विजय कंदेवाड, आरोग्य संचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग

जाळे कार्यरत

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, बहुतांश बेकायदा गर्भलिंग निदान नोंदणीकृत सोनोग्राफी केंद्रांमध्ये होत नसून काही बोगस डॉक्टर आणि दलालांच्या माध्यमातून हे रॅकेट चालवले जात आहे. पोर्टेबल पद्धतीने वापरल्या जाणाऱ्या सोनोग्राफी यंत्राने महिलांच्या घरी जाऊन तपासणी केली जाते. त्यानंतर बेकायदा गर्भपात केला जातो. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये दलाल आणि बोगस डॉक्टरांचे जाळे कार्यरत असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

हेल्पलाइनवर १,१२४ तक्रारी

गर्भलिंग निदान आणि बेकायदा गर्भपातासंदर्भातील तक्रारींसाठी राज्यात १०४ आणि १८००२३३४४७५ हे टोल-फ्री क्रमांक उपलब्ध आहेत. फेब्रुवारी २०२५ पर्यंत १,१२४ तक्रारी प्राप्त होऊन १,१०२ तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे.

१२९ दोषींना शिक्षा

पीसीपीएनडीटी कायद्याअंतर्गत राज्यात आतापर्यंत ६२५ न्यायालयीन प्रकरणे दाखल झाली आहेत. १२९ डॉक्टरांना दोषी ठरवून शिक्षा करण्यात आली असून १६३ प्रकरणे प्रलंबित आहेत.

ऑपरेशन सिंदूरमधील हुतात्मा वीर जगासमोर

पान १ वरून

सुभेदार मेजर पवनकुमार (१० इन्फंट्री ब्रिगेड), रायफलमॅन सुनीलकुमार (४- जम्मू काश्मीर लाइट इन्फंट्री), लान्सनायक दिनेशकुमार (५ फिल्ड रेजिमेंट), एव्हिएशन तंत्रज्ञ मूद मुरली नायक (८५१ लाइट रेजिमेंट), हवालदार सुनीलकुमार सिंह (फिल्ड वर्कशॉप कंपनी) आणि सार्जंट सुरेंद्रकुमार यांनी 'ऑपरेशन सिंदूर'वेळी देशासाठी सर्वोच्च बलिदान दिले होते.

पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने ७ मे २०२५ रोजी सकाळी 'ऑपरेशन सिंदूर'ला सुरुवात केली होती. या मोहिमेदरम्यान पाकिस्तानातील अनेक हवाई तळ आणि दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले होते.

THE MAHARASHTRA AGRO-INDUSTRIES DEVELOPMENT CORPORATION LIMITED, MUMBAI

(A Govt. of Maharashtra Undertaking)
Krushiudyog Bhavan, Aarey Milk Colony, Dinakaran Desai Marg, Goregaon (E),Mumbai - 65. Tel. 022-28719364
E-mail - agroenggmaidc@gmail.com

R.F.P. NOTICE 2026-27

Online-Request for Proposal invites for Procurement of following Agricultural Equipment.

R.F.P. No.	Name of the Agri. Implements.
MAIDC/AE/RFP/ 2026-27/SPAD/01	Chlorophyll Meter (SPAD meter) and Its AMC.
MAIDC/AE/RFP/ 2026- 27/SOCDK/02	Soil Organic Carbon Detection Kit with Training Manual developed by Bhabha atomic research centre - BARC.

Last date of submission - 13.07.2026.

Interested Bidders are requested to enroll and visit Maharashtra State E-tendering Portal – www.mahatenders.gov.in for details of the tender documents.Tender document can also be seen on our website **www.maidcmumbai.com**

Sd/-
(Suresh Sonawane)
Dy. Gen. Manager (AE)

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
शंकर शेठ रोड, स्वारगेट, पुणे–४११०३७

शुध्दीपत्रक

दि. २४/०६/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. मालमत्ता विभागाकडील निविदा क्र. ०१ ते ४३ मधील 'अ' पाकीटातील कागदपत्रा मधील दुरुस्ती खालीलप्रमाणे आहे :

अ.क्र.	मूळ निविदेमध्ये नमूद	सुधारणा
१	जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र	जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, लागू असल्यास

सही/–
सहव्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

जाहीर नोटीस

नमूना ८
(नियम १७ पहा)

३२ ग दावा क्र. ११/२०२५/३४४२

मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ ग, (१) या अन्वये द्यावयाची जाहीर नोटीस

ज्या अर्थी, मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ यांच्या कलम ३२ अन्वये प्रत्येक कुळाने कलम ३२ यात दिलेल्या शर्तीस अधीन राहून, त्यांने कुळ म्हणून धारण केलेली जमिन खरेदी केलेली आहे, असे समजण्यात येते, आणि ज्याअर्थी, ती जमिन खरेदी करण्याची कुळाची इच्छा आहे. किंवा कसे हे कलम ३२ ग पोटकलम (३) व (४) याव्दारे निश्चित करणे व त्याची तशी ईच्छा असल्यास, जमिनीची खरेदी किंमत ठरवणे हे न्यायाधिकरणास भाग आहे.

त्याअर्थी, आता खाली नमुद केलेल्या व्यक्ती म्हणजे-

१) श्री. अशफाक हसन शफिक हसन शाली
२) श्री. तौसिफ इलाही साजीद खान
३) श्रीम. बानो शफिक हसन शाली
४) श्री. मोहम्मद फराझ हसन शाह
५) श्रीम. राणा फातीमा इमरान अली काणेकर
६) श्री. रिझवान सतीश धानुका
७) श्रीम. सना फातीमा साजीद अली खान
रा. कलोते मोकाशी, ता. खालापूर, जि. रायगड.

अ.क्र. ०१ ते ०७ यांचे वतीन कुलअखत्यारी
श्री. सच्चानंद हिरालाल लालवाणी
रा. ११०२, गार्डन कोर्ट, एम.एम.जी.एस. रोड दादर पूर्व,
ऑ. अनशाईन प्लाझा, मुंबई- ४०० ०१४. ------- **अर्जदार**

विरुध्द

१) श्री. माधव सदाशिव बेहेरे मयत वारस
१/१. श्रीमती. लता माधव बेहेरे
(1/1. Mrs. Lata madhav behere)
१/२. श्री. शशिकांत माधव बेहेरे
(1/2. Shri. Shashikant madhav behere)
Sr.No. 1/1 & 1/2 Add. 1A Stanton Terrace Longfield,
Auckland 1, NewZealand
१/३. श्रीम. मधुरा अशुतोष कात्रे
रा. प्लॉट नं. ३१४, ए शिवश्री अपार्टमेंट, धन्वंतरी हॉस्पिटलसमोर, खरे टाउन शंकर नगर, नागपूर- ४४००१० महाराष्ट्र.
२) श्री. अरविंद भालचंद्र दर्शने
३) श्री. अशोक भालचंद्र दर्शने
रा. इशा प्रसाद हौ. सोसायटी, २ रा मजला,
अंधेरी रेल्वे स्टेशनजवळ, अंधेरी पूर्व- ४०० ०६९. ----- **सामनेवाले**

अ) ज्या कुळांनी कलम ३२ ग अन्वये **रायगड** जिल्हातील **खालापूर** तालुक्यातील, **मौजे- कलोते रयती** या गावातील जमिनी खरेदी केल्या आहेत. असे समजण्यात येते अशी सर्व कुळे,

ब) अशा जमिनीचे सर्व कुळ/मालक आणि

क) त्यात हितसंबंध असलेले इतर सर्व व्यक्ती, यांस, हया नमुन्यास जोडलेल्या अनुसुचित निदिष्ट केलेल्या व जिथे त्याचा हितसंबंध असेल अशा जमिनीसमोर दर्शविलेल्या तारखेस व वेळी दि. ०३/०७/२०२६ सकाळी ११.३० वाजता या न्यायाधिकरणासमोर हजर राहण्यास फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती, न्यायाधिकरणाची अगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचून, नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणासमोर हजर राहण्यास कसूर करील, तर त्या बाबीसंबधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल व तिच्या गैरहजेरीत चौकशीचे काम पुढे चालू राहील.

दावा मिळकत

गावाचे नाव	स.नं./हि.नं./गट नं.	क्षेत्र	आकार
कलोते रयती	१००/२	१०-८९-००	८.७८

ठिकाणी :- खालापूर
दिनांक :- २२ जून २०२६

सही/-
(अभय चव्हाण)
तहसीलदार व शेतजमिन न्यायाधिकरण, खालापूर

महिंद्रा हॉलीडेज ॲण्ड रिसॉर्टस इंडिया लिमिटेड

ClubMahindra

(CIN: L55101MH1996PLC405715)
नोंदणीकृत कार्यालय: महिंद्रा टॉवर्स, १ला मजला, 'ए' विंग, डॉ. जी. एम. भोसले मार्ग, पी. के. कुरणे चौक, वरळी, मुंबई – ४०० ०१८ । दू.: +९१ २२ ६९१८ ४७२२
संकेतस्थळ: www.clubmahindra.com, **ई–मेल:** investors@mahindraholidays.com

३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई–मतदानाबाबतची माहिती

याद्वारे सूचना देण्यात येते की, 'महिंद्रा हॉलिडेज अँड रिसॉर्ट्स इंडिया लिमिटेड' (''कंपनी'') च्या सदस्यांची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') बुधवार, २२ जुलै २०२६ रोजी दुपारी ३:३० वाजता (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/इतर ऑडिओ–व्हिज्युअल माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) आयोजित केली जाईल. या सभेत एजीएमच्या सूचनेत नमूद केलेले कामकाज पार पाडले जाईल. हे आयोजन 'कंपनी कायदा, २०१३' ('कायदा') आणि त्याअंतर्गत केलेले नियम, तसेच सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ('लिस्टिंग रेग्युलेशन्स') मधील लागू तरतुदींचे पालन करून केले जाईल; तसेच यासाठी 'कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय' ('एमसीए') चे सामान्य परिपत्रक क्र. २०/२०२० (दिनांक ५ मे २०२०), सामान्य परिपत्रक क्र. १४ व १७/२०२० (अनुक्रमे ८ एप्रिल २०२० आणि १३ एप्रिल २०२०), सामान्य परिपत्रक क्र. ०९/२०२३ (दिनांक २५ सप्टेंबर २०२३), सामान्य परिपत्रक क्र. ०९/२०२४ (दिनांक १९ सप्टेंबर २०२४) आणि सामान्य परिपत्रक क्र. ०३/२०२५ (दिनांक २२ सप्टेंबर २०२५) ('एकत्रितपणे एमसीए परिपत्रके' म्हणून संदर्भित) यांचाही विचार केला जाईल. ३० व्या एजीएमचे कामकाज कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात पार पडले असे मानले जाईल आणि तेच या एजीएमचे अधिकृत ठिकाण मानले जाईल.

कोरम (गणपूर्ती) आणि सूचना पाठवणे:

कायद्याच्या कलम १०३ अन्वये कोरम निश्चित करण्याच्या उद्देशाने, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) किंवा ऑडिओ–व्हिज्युअल माध्यमाद्वारे (ओएव्हीएम) वार्षिक सर्वसाधारण सभेत (एजीएम) सहभागी होणाऱ्या सदस्यांची गणना केली जाईल. ही सभा व्हीसी/ओएव्हीएमद्वारे आयोजित केली जात असल्याने, सदस्यांना 'प्रॉक्सी' (प्रतिनिधी) नियुक्त करण्याची सुविधा उपलब्ध नसेल.

एमसीए परिपत्रके आणि लिस्टिंग नियमांचे पालन करून, कंपनीने ३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची (एजीएम) सूचना आणि आर्थिक वर्ष २०२६ चा एकात्मिक वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक स्वरूपात गुरुवार, २५ जून २०२६ रोजी त्या सदस्यांना पाठवला आहे, ज्यांचे ई–मेल पत्ते कंपनीकडे, 'केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड' (नोंदणी आणि हस्तांतरण प्रतिनिधी–''केफिनटेक'' किंवा ''आरटीए'') कडे किंवा 'डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स' (''डीपी'') कडे नोंदणीकृत आहेत.

वार्षिक सर्वसाधारण सभेची (एजीएम) सूचना आणि आर्थिक वर्ष २०२६ चा एकात्मिक वार्षिक अहवाल कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत आणि खाली दिलेल्या वेब–लिंक द्वारे ते पाहता किंवा डाउनलोड करता येतील:

वेबसाईट लिंक: https://www.clubmahindra.com/investors/financials

आर्थिक वर्ष २०२६ साठीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची (एजीएम) सूचना आणि एकात्मिक वार्षिक अहवाल हे स्टॉक एक्स्चेंजच्या (म्हणजेच बीएसई लिमीटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडीया लिमीटेड) अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com या संकेतस्थळांवर उपलब्ध आहेत; तसेच ते कंपनीच्या आरटीए (नोंदणी आणि हस्तांतरण एजंट) असलेल्या केफिन टेक्नॉलॉजीज् लिमिटेड (केफिनटेक) च्या https://evoting.kfintech.com. या संकेतस्थळावरही अपलोड करण्यात आले आहेत. ज्या सदस्यांना एजीएमची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२६ साठीचा एकात्मिक वार्षिक अहवाल यांची छापील प्रत हवी असेल, ते investors@mahindraholidays.com वर ईमेलद्वारे विनंती करू शकतात.

लिस्टिंग नियमावलीच्या (लिस्टिंग रेग्युलेशन्स) नियम ३६(१)(बी) अन्वये, ज्या सदस्यांनी कंपनी/आरटीए/डीपी (डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स) यांच्याकडे आपला ईमेल पत्ता नोंदवलेला नाही, त्यांना ३० व्या एजीएमची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२६ साठीचा एकात्मिक वार्षिक अहवाल पाहण्यासाठी आवश्यक असलेली वेब–लिंक आणि क्यूआर कोड दर्शवणारे पत्र पाठवले जात आहे.

एजीएममध्ये सहभाग: सदस्य केवळ व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारेच एजीएममध्ये सहभागी होऊ शकतात. सदस्य कंपनीच्या आरटीएद्वारे पुरविल्या जाणाऱ्या व्हीसी प्लॅटफॉर्मवर https://emeetings.kfintech.com येथे लॉग–इन करून एजीएमला उपस्थित राहू शकतात. एजीएममध्ये सामील होण्याबाबतच्या तपशीलवार सूचना एजीएमच्या सूचनेत दिल्या आहेत.

रिमोट ई–व्होटिंग आणि एजीएम दरम्यान ई–व्होटिंग: कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०८ (सुधारित 'कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४' च्या नियम २० सह वाचले जाणारे) आणि लिस्टिंग नियमावलीच्या नियमन ४४ (सेबी मास्टर परिपत्रक क्र. HO/49/14/14(7)2025-CFD-POD2/I/3762/2026, दिनांक ३० जानेवारी २०२६ सह वाचले जाणारे) मधील तरतुदींचे पालन करून, कंपनी आपल्या सदस्यांना 'रिमोट ई–व्होटिंग' आणि 'एजीएम दरम्यान ई–व्होटिंग' (एकत्रितपणे 'ई–व्होटिंग') ची सुविधा देत आहे. ही सुविधा अशा सदस्यांसाठी उपलब्ध आहे ज्यांची नावे 'कट–ऑफ तारीख' म्हणजेच बुधवार, १५ जुलै २०२६ रोजी कंपनीच्या सदस्य नोंदवहीमध्ये किंवा डिपॉझिटरीजकडे असलेल्या 'बेनिफिशियल ओनर्स'च्या (लाभार्थी मालकांच्या) नोंदवहीमध्ये नोंदवलेली आहेत, जेणेकरून ते एजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या कामकाजावर आपली मते नोंदवू शकतील. सदस्यांचे मतदानाचा अधिकार हा कट–ऑफ तारखेला कंपनीच्या 'पेड–अप इक्विटी शेअर भांडवला'मधील त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणात असेल. कट–ऑफ तारखेला इक्विटी शेअर्स धारण करणारे सदस्यच मतदान करण्यास पात्र असतील. सदस्य मतदानाच्या केवळ एकाच पद्धतीची निवड करू शकतात, म्हणजेच एकतर रिमोट ई–व्होटिंगद्वारे किंवा एजीएम दरम्यान मतदानाद्वारे. एकदा का एखाद्या सदस्याने ठरावावर मतदान केले की, ते नंतर बदलता येणार नाही.

ई–व्होटिंगसाठी तपशीलवार सूचना एजीएमच्या सूचनेत दिल्या आहेत आणि त्या केफिनटेकच्या https://evoting.kfintech.com. या वेबसाइटवरही उपलब्ध आहेत.

रिमोट ई–व्होटिंगचा तपशील

ई–मतदानासाठी पात्रता निश्चित करण्याची अंतिम तारीख:	**बुधवार, १५ जुलै २०२६**
रिमोट ई–मतदान सुरू होण्याची तारीख:	**शुक्रवार, १७ जुलै २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता (भाप्रवे)**
रिमोट ई–मतदान संपण्याची तारीख:	**मंगळवार, २१ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता (भाप्रवे)**

वर नमूद केलेल्या दिनांक आणि वेळेनंतर केफिनटेकद्वारे 'रिमोट ई–व्होटिंग' (दूरस्थ ई–मतदान) सुविधा बंद केली जाईल आणि त्यानंतर सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही. ज्या सदस्यांनी रिमोट ई–व्होटिंगद्वारे आधीच मतदान केले आहे, ते एजीएममध्ये सहभागी होऊ शकतात, परंतु त्यांना एजीएममध्ये पुन्हा मतदान करण्याचा अधिकार नसेल.

सूचना (नोटीस) पाठवल्यानंतर लॉगिन आयडी आणि पासवर्ड मिळवण्याची पद्धत: एजीएमची सूचना पाठवल्यानंतर ज्या व्यक्तीने इक्विटी शेअर्स खरेदी केले आहेत आणि कंपनीचे सदस्य झाले आहेत, तसेच 'कट–ऑफ' तारखेला (म्हणजेच बुधवार, १५ जुलै २०२६ रोजी) ज्यांच्याकडे शेअर्स आहेत, अशा व्यक्ती एजीएम सूचनेतील 'टीप क्र. आर' मध्ये दिलेल्या प्रक्रियेचे पालन करून युजर आयडी आणि पासवर्ड मिळवू शकतात. ज्या सदस्यांना युजर आयडी आणि पासवर्ड मिळवण्यासाठी मदतीची आवश्यकता आहे, ते आरटीएला evoting@kfintech.com या ईमेलवर विनंती पाठवू शकतात किंवा केफिनटेकच्या १८००–३०९–४००१ या टोल–फ्री क्रमांकावर कॉल करू शकतात.

ई–मतदान आणि एजीएम मधील सहभागाबाबत मदतीसाठी संपर्क तपशील:

कोणत्याही शंका किंवा तक्रारीच्या बाबतीत, सदस्य https://evoting.kfintech.com (केफिनटेक वेबसाइट) च्या 'डाउनलोड' विभागात उपलब्ध असलेली 'मदत आणि वारंवार विचारले जाणारे प्रश्न' (एफएक्यू) आणि 'ई–व्होटिंग युजर मॅन्युअल' पाहू शकतात; किंवा अधिक स्पष्टीकरणासाठी सुश्री शर्मिला अमीन (सहाय्यक उपाध्यक्ष – कॉर्पोरेट रजिस्ट्री) यांच्याशी evoting@kfintech.com वर संपर्क साधू शकतात किंवा केफिनटेकच्या टोल–फ्री क्रमांक १–८०० ३०९–४००१ वर कॉल करू शकतात.

सदस्यांच्या कोणत्याही शंका किंवा तक्रारी कंपनीकडे investors@mahindraholidays.com या ईमेल आयडीवर देखील पाठवल्या जाऊ शकतात.

महिंद्रा हॉलिडेज अँड रिसॉर्ट्स इंडिया लिमिटेडसाठी
सही/–
मानसी लहेरी
कंपनी सेक्रेटरी
एसीएस क्र.: २१५६१

ठिकाण: मुंबई
दिनांक: २७ जून २०२६

ORACLE

ओरॅकल फायनान्शिअल सर्व्हिसेस सॉफ्टवेअर लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: ओरॅकल पार्क, पश्चिम द्रुतगती महामार्गाजवळ, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३
दूरध्वनी: +९१ २२ ६७१८ ३००० **फॅक्स:** +९१ २२ ६७१८ ३००१ **सीआयएन:** एल७२२००एमएच१९८९पीएलसी०५३६६६
वेबसाइट: https://investor.ofss.oracle.com **ई–मेल:** investors-vp-ofss_in_grp@oracle.com

३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि ई–व्होटींग माहिती यासंबंधी सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, ओरॅकल फायनान्शियल सर्व्हिसेस सॉफ्टवेअर लिमिटेडच्या ('कंपनी') ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') १० जून २०२६ तारखेच्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेले कामकाज पार पाडण्यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ('व्हीसी') / इतर ऑडिओ व्हिज्युअल प्रकारांद्वारे ('ओएव्हीएम') **गुरूवार, २३ जुलै २०२६ रोजी दुपारी ३:०० वाजता भारतीय वेळेनुसार** घेण्यात येईल.

कंपनी व्यवहार मंत्रालय ('एमसीए परिपत्रके') आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ('सेबी') यांच्या परिपत्रकांचे पालन करत आर्थिक वर्ष २०२५–२६ साठीचा कंपनीचा वार्षिक अहवाल आणि एजीएमची नोटीस, २५ जून २०२६ रोजी, ज्या सभासदांचे ईमेल आयडी कंपनीकडे/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत आहेत, त्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवण्यात आलेली आहे. २२ सप्टेंबर २०२५ रोजी जारी करण्यात आलेले सामान्य परिपत्रक क्रमांक ०३/२०२५ आणि यासह एकत्रित वाचलेले एमसीएव्दारे यापूर्वी याचसंदर्भात जारी केलेली इतर परिपत्रके यांच्यानुसार व्हीसी/ओएव्हीएमव्दारे एजीएम घेण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.

त्याचबरोबर, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ३६(१) (ब) नुसार, ज्या सभासदांनी कंपनी/डिपॉझिटरीज पार्टिसिपंटमध्ये त्यांचा ई–मेल पत्ता नोंदणीकृत केलेला नाही, त्यांना वार्षिक अहवालाच्या वेब–लिंकबाबतचे पत्र पाठवले जात आहे.

२०२५–२६ या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, ज्यामध्ये एजीएमची सूचना समाविष्ट आहे, कंपनी (https://www.oracle.com/a/ocom/docs/industries/financial-services/ofss-software-limited-ar-2025-26.pdf), बीएसई (www.bseindia.com), एनएसई (www.nseindia.com) आणि नॅशनल सिक्युरिटिज डिपॉझिटरी लिमिटेड ('एनएसडीएल') (www.evoting.nsdl.com) या संकेतस्थळावरून डाउनलोड करू शकता.

रिमोट ई–व्होटींग/ई–व्होटींग एजीएम दरम्यान:

१. कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम १०८ तसेच कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) रूल्स, २०१४ चा नियम २०, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन, २०१५ चे रेग्युलेशन ४४ आणि इंस्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया द्वारे जारी करण्यात आलेल्या सेक्रेटरीयल स्टॅंडर्ड ऑन जनरल मिटिंगचे (एसएस–२) (प्रत्येकामध्ये वेळोवेळी सुधारणा किंवा फेरबदल करण्यात आल्याप्रमाणे) यांच्या परिभाषेमध्ये, कंपनी ह्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या कामकाजांच्या बाबीवर, एनएसडीएलद्वारे प्रदान करण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान सुविधेद्वारे, सभासदांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याची सुविधा प्रदान करत आहे.
२. रिमोट ई–व्होटींग हे शनिवार, १८ जुलै २०२६ रोजी (सकाळी ९:०० वाजता भारतीय वेळेनुसार) सुरू होईल.
३. रिमोट ई–व्होटींग हे बुधवार, २२ जुलै २०२६ रोजी (संध्याकाळी ५:०० वाजता भारतीय वेळेनुसार) समाप्त होईल, एनएसडीएलद्वारे रिमोट ई–व्होटींग अकार्यान्वित करण्यात येईल. सभासदाने एकदा मतदान केल्यावर, सभासद त्यानंतर त्यामध्ये बदल करू शकणार नाहीत.
४. कट–ऑफ तारखेला म्हणजेच गुरूवार, १६ जुलै २०२६ रोजी शेअर्स धारण करणारे (वास्तविक स्वरुपात किंवा डिमटेरियलाइज्ड स्वरुपात) कंपनीचे सभासद रिमोट ई–व्होटींगची किंवा एजीएमच्या वेळी ई–व्होटींग करण्याची सुविधा प्राप्त करण्यासाठी हक्कदार असतील. कट–ऑफ दिनांकापर्यंत सदस्य नसलेल्या व्यक्तींनी ही सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने समजावी.
५. रिमोट ई–व्होटींगद्वारे अगोदरच आपले मतदान करणारे सभासद हे एजीएमला उपस्थित राहू शकतील परंतु त्यांना एजीएमदरम्यान मतदान करण्यास अनुमती असणार नाही.
६. कट–ऑफ तारखेला म्हणजेच गुरुवार, १६ जुलै २०२६ रोजी समभाग धारण केलेल्या आणि दूरस्थ ई–मतदान किंवा ई–मतदानासाठी लॉगिन आयडी आणि पासवर्ड नसलेली कोणतीही व्यक्ती evoting@nsdl.com येथे विनंती पाठवून ते मिळवू शकते.
७. व्हीसी / ओएव्हीएम सुविधेद्वारे एजीएममध्ये उपस्थित असलेले आणि ज्यांनी दुरस्थ ई–व्होटींगद्वारे आपले मतदान केलेले नाही आणि ज्यांना अन्यथा मतदान करण्यापासून प्रतिबंध घालण्यात आलेला नाही असे सभासद एजीएमदरम्यान ई–व्होटींग प्रणालीद्वारे मतदान करण्यासाठी पात्र असतील.
८. कंपनीने मेसर्स पी. दिवाण अँड असोसिएट्स, कंपनी सेक्रेटरीज (फर्म नोंदणी क्रमांक – पी२०१५एमएच०४१४००) यांना मतदान आणि प्रत्यक्ष एजीएमच्यावेळी मतदानाची प्रक्रिया पूर्णपणे निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी छाननीकर्ता म्हणून नियुक्त केलेले आहे.
९. ज्या सदस्यांनी आपल्या ईमेल पत्त्याची आणि मोबाईल क्रमांकाची नोंदणी केलेली नाही, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी डीमटेरियलाइज्ड स्वरूपात असलेल्या समभांगासाठी त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपेंटकडे तर कागदी स्वरुपात असलेल्या समभागासाठी मेसर्स केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड यांना einward.ris@kfintech.com वर ईमेल पाठवून नोंदणी करावी. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदानासाठी आणि ऑनलाईन सभांना उपस्थित राहण्यासाठी ईमेल पत्ता आणि मोबाईल क्रमांकाची नोंदणी अनिवार्य आहे.
१०. अशी कोणतीही व्यक्ती, जी कंपनीचा वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे पाठवल्यानंतर आणि निश्चित केलेल्या अंतिम तारखेपूर्वी (कट–ऑफ) कंपनीची सभासद बनली असेल, ती evoting@nsdl.com वर विनंती पाठवून मतदानासाठी आणि एजीएमला उपस्थित राहण्यासाठी युझर आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. तथापि, जर ती व्यक्ती इ–मतदानासाठी आधीपासूनच एनएसडीएलकडे नोंदणीकृत असेल, तर मतदान करण्यासाठी आणि सभेला उपस्थित राहण्यासाठी सध्याचाच युझर आयडी आणि पासवर्ड वापरु शकते.
११. इ–मतदान आणि व्हीसी/ ओएव्हीएमव्दारे एजीएमला उपस्थित राहण्याची तपशीलवार प्रक्रिया आणि विविध सूचना नोटीसमध्ये नमूद केलेल्या आहेत. इ–मतदानाबाबत काही शंका किंवा प्रश्न असल्यास, तुम्ही www.evoting.nsdl.com या वेबसाइटवरील डाउनलोड विभागामध्ये समभागधारकांसाठी उपलब्ध असलेले फ्रिक्वेन्टली आस्कड क्वेश्चन्स (एफएक्यू) आणि ई–व्होटिंग युझर मॅन्युअल पाहू शकतात किंवा ०२२ – ४८८६ ७००० या क्रमांकावर दूरध्वनी करू शकतात किंवा evoting@nsdl.com वर इमेलद्वारे आपली विनंती पाठवू शकतात.

पुस्तिका बंद

पुढे, याद्वारे सूचित करण्यात येते की कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम ९१ तसेच त्याअंतर्गत येणारे नियम यांच्या अनुरोधाने, सभासदांचे रजिस्टर आणि कंपनीची शेअर हस्तांतरण पुस्तिका हे शुक्रवार, १७ जुलै २०२६ ते गुरूवार, २३ जुलै २०२६ (दोन्ही दिवस समाविष्ट) या कालावधीमध्ये एजीएमच्या हेतूसाठी बंद राहतील.

ओरॅकल फायनान्शिअल सर्व्हिसेस सॉफ्टवेअर लिमिटेड करिता
सही/–
ओंकारनाथ बॅनर्जी
कंपनी सेक्रेटरी आणि अनुपालन अधिकारी

स्थळ : मुंबई
दिनांक : जून २५, २०२६